# व्यवस्थापन परिषद सभेचा कार्यवृत्तांत

सोलापूर विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सभा दि.०९ जुलै २००८ रोजी दुपारी १-३० वा. व्यवस्थापन परिषदेच्या सभागृहामध्ये झाली. या सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. बी. पी. बंडगर - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. सौ. व्ही. जे. नाईकनवरे | सदस्या |
| ३) | ॲड. श्री. रामदास पी. सब्बन | सदस्य |
| ४) | डॉ. एल. पी. देशमुख | सदस्य |
| ५) | डॉ. पी. बी. जोशी, प्र.संचालक म. व वि. वि. मं. तथा प्र. वित्त व लेखा अधिकारी | सदस्य तथा स्थायी निमंत्रित |
| ६) | प्राचार्य श्री. जे. के. बिले | सदस्य |
| ७) | डॉ. सी. बी. कोळेकर | सदस्य |
| ८) | डॉ. पी. जी. मोरे | सदस्य |
| ९) | श्री. एन. बी. पवार | सदस्य |
| १०) | प्रा. बी. पी. रोंगे | सदस्य |
| ११) | श्रीमती मिनाक्षी सुभाष कदम | सदस्या |
| १२) | डॉ. एम. एस. शेजूळ - प्र. कुलसचिव तथा परीक्षा नियंत्रक | सदस्य सचिव तथा स्थायी निमंत्रित |

श्री. पी. एम. हिरेमेठ व डॉ. बी. बी. कदम सहसंचालक उच्च शिक्षण सहसंचालनालय कोल्हापूर विभाग यांनी व्यवस्थापन परिषदेच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याचे अनुक्रमे पत्राद्वारे व दूरध्वनीद्वारे कळविले त्यानुसार त्याची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली.

विद्यापीठाकडील लेखापाल श्री. एम. आर. कोरवी यांचे मिरज येथे उपचार चालू असताना दुःखद निधन झाले तसेच मानसेवी लेखनिक श्री. एस. आर. लोखंडे यांचे दम्याच्या विकारामुळे दुःखद निधन झाले. डॉ. बी. पी. बंडगर कुलगुरु यांच्या सुकन्या कु. सुनिता हिचे हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले या सर्वांच्या मृतात्म्यास श्रध्दांजली वाहण्यात आली.

सभेच्या सुरुवातीस सदस्य सचिव यांनी व्यवस्थापन परिषदेच्या सर्व मान्यवर सदस्यांचे स्वागत करुन मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेस सुरुवात केली.

**विषय क्र. १: दि. २८ मार्च २००८ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव क्र. १: दि. २८ मार्च २००८ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला तसेच येथून पुढे व्यवस्थापन परिषदेच्या सर्व सदस्यांना व्यवस्थापन परिषदेच्या सभेची कार्यक्रमपत्रिका सी. डी. द्वारे पाठविण्यात यावी असे ठरले.**

**विषय क्र. २: महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम २८ (x) नुसार मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.**

(सोबत अहवाल जोडला आहे)

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा. कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.

**ठराव क्र. २: महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम २८ (x) नुसार मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करावयाच्या अहवालामध्ये खालील दुरुस्त्यांसह अहवालास मान्यता दिली.**

**१) पान क्र. १६ वर, कुलसचिव कार्यालयाच्या माहितीमध्ये दुसऱ्या परिच्छेदामध्ये "जून" ऐवजी "जुलै" अशी दुरुस्ती करावी.**

**२) पान क्र. १७ वर, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माहितीमध्ये दुसऱ्या परिच्छेदामध्ये "प्राशिकरण" ऐवजी "प्राधिकरण" अशी दुरुस्ती करावी.**

**३) मा. कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवालामध्ये अहवाल कोणत्या तारखेपासून कोणत्या तारखेपर्यंत आहे याची तारीख नमूद करावी.**

**विषय क्र. ३:** **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ७९ (ii) अन्वये कुलसचिव या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेमधील सदस्यांमधून दोन सदस्यांचे नामांकन करण्याबाबत प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेस सादर.**

टिपः यासंबंधी असे सादर करण्यात येते की, विद्यापीठाने कुलसचिव या पदासाठी जाहिरात क्र. एसयुएस/ईएसटी/०१३ दि.०६ मे २००८ व शुध्दीपत्रक क्र. एसयुएस/ईएसटी/०१६ दि.१० जून २००८ अन्वये जाहिरात दिली होती.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ७९ (ii) नुसार व्यवस्थापन परिषदेने, व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून दोन सदस्यांचे कुलसचिव या पदाच्या निवड समितीवर नामांकन करण्यासाठी प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेस सादर.

**ठराव क्र. ३:** **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ७९ (ii) अन्वये कुलसचिव या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेमधील सदस्यांमधून खालील दोन सदस्यांचे नामांकन व्यवस्थापन परिषदेने केले.**

**१) मा. श्री. जयसिंह मोहिते-पाटील**
**२) प्राचार्य श्री. जे. के. बिले**

**विषय क्र. ४:** **सन २००७-०८ सालातील टी. ए. बिल अदा करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी :- प्रा. सौ. रजनी दळवी, ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालय, सोलापूर.
दि. ७ ते ९ सप्टेंबर, २००७ चेस स्पर्धेच्या निवड समिती सदस्य म्हणून संगमेश्वर कॉलेज,सोलापूर येथे उपस्थित होत्या. त्यांचे टी. ए. बिल रक्कम रु.१८०/- तसेच दि. ५ ते ६ डिसेंबर, २००७ ज्युदो स्पर्धेच्या निवड समिती सदस्य म्हणून एच. एन. कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर येथे उपस्थित होत्या त्यांचे टी. ए. बिल रक्कम रु.२७०/- असे एकूण रु.४५०/-
प्रा. पुदे एन. एन., बी. पी. एड. कॉलेज, नेहरुनगर, सोलापूर.
दि. १७ ते १९ सप्टेंबर, २००७ चेस स्पर्धेच्या निवड समिती सदस्य म्हणून संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर येथे उपस्थित होते. त्यांचे टी. ए. बिल रक्कम रु.२७०/-
प्रा. तरंगे व्ही. डी., बी. पी. एड. कॉलेज नेहरुनगर, सोलापूर
दि. १७ ते १९ सप्टेंबर, २००७ चेस स्पर्धेच्या निवड समिती सदस्य म्हणून संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर येथे उपस्थित होते. त्यांचे टी. ए. बिल रक्कम रु.२७०/-

वरील प्राध्यापकांचे टी. ए. बिल अदा करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र. ४:** **सन २००७-०८ सालातील टी. ए. बिल अदा करण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. ५:** **सोलापूर विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांच्या संलग्निकरण शुल्काची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी.**

टिपणीः- सोलापूर विद्यापीठाकडून विविध महाविद्यालयातील संलग्निकरणाबाबत आकारण्यात येणारे शुल्क हे इतर विद्यापीठाच्या मानाने कमी आहे असे निदर्शनास आले. निरनिराळ्या प्रकारचे शुल्क ठरवण्यासाठी विद्यापरिषद व व्यवस्थापन परिषद यांनी एका समितीचे गठन केले आहे. सदर समितीचे सदस्य प्रा. श्री. मठपती एस. के. यांचे पद रिक्त झाल्यामुळे मा. कुलगुरुंनी त्यांचे जागी विद्यापरिषदेच्या सदस्यांमधून दोन सदस्यांचे नामनिर्देशन केले. त्यांनतर वरील समिती खालीलप्रमाणे होते.

१) प्राचार्य जे. के. बिले
२) प्राचार्य के. एम. जमादार
३) डॉ. डी. डी. रणनवरे
४) प्राचार्य डॉ. एच. एन. जगताप
५) प्रा. डॉ. ए. बी. सुर्यवंशी

६) डॉ. पी. बी. जोशी - प्र. संचालक, म. व वि. वि. मं. - सचिव

सदर समितीने संलग्निकरणाच्या शुल्कांची शिफारस करण्यासाठी आपली बैठक दि.१६/६/२००८ रोजी घेतली होती. सदरच्या समितीने इतर विद्यापीठाकडून आकारण्यात येणाऱ्या संलग्निकरण शुल्काची व सोलापूर विद्यापीठाकडून आकारण्यात येणाऱ्या संलग्निकरण शुल्काचा तुलनात्मक तक्ता करुन सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे संलग्निकरणाच्या शुल्काची शिफारस केलेली आहे. सदरच्या संलग्निकरणाचे शुल्काची अंमलबजावणी जून २००८ पासून करण्याची समितीने शिफारस केलेली आहे. सदरची बाब महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (व्ही) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी..

**ठराव क्र. ५: सोलापूर विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांच्या संलग्निकरण शुल्कास दुरुस्तीसह व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. ६: कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी या महाविद्यालयाच्या जून २००८ पासून एम. पी. एड. भाग २ च्या विस्तारीत मान्यतेबाबत.**

कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी महाविद्यालयाचे जून २००८ पासून एम. पी. एड. भाग २ च्या विस्ताराचे प्रस्ताव ऑगस्ट २००७ पूर्वी सादर करणे आवश्यक होते. तथापि सदरच्या महाविद्यालयाने उपरोक्त प्रस्ताव माहे जून २००८ मध्ये सादर केलेला आहे.

त्याचप्रमाणे उपरोक्त अभ्यासक्रमाच्या विस्तारास शासनाची मान्यता आवश्यक असते. शिवाजी विद्यापीठाचे परिपत्रक क्र. ८ अन्वये Ordinances १३० (i) प्रमाणे असे उशिरा प्राप्त होणाऱ्या प्रस्तावाकरिता नियिमत शुल्काव्यतिरिक्त रु.१०००/- प्रमाणे दंड आकारण्याची कायद्यात तरतूद आहे. त्याप्रमाणे महाविद्यालने प्रतिमहिना रु.१०००/- या प्रमाणे दंड भरलेला आहे.

सदरची बाब महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समितीच्या वतीने मा.कुलगुरुंनी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ शिफारस केलेली आहे. सबब एम. पी. एड. भाग २ या अभ्यासक्रमाच्या नैसर्गिक वाढीचा प्रस्ताव शासनास शिफारस करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र. ६: कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी या महाविद्यालयाच्या जून २००८ पासून एम. पी. एड. भाग २ च्या विस्तारास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. ७: के. एन. भिसे आर्टस् ॲन्ड कॉमर्स महाविद्यालय, कुर्डूवाडी या महाविद्यालयाच्या नैसर्गिक वाढीच्या विषयाबाबत शासनास शिफारस करण्याची बाब विचारार्थ.**

टिपणी: के. एन. भिसे आर्टस् ॲन्ड कॉमर्स महाविद्यालय, कुर्डूवाडी या महाविद्यालयास जून २००५ पासूनच्या बी. एस्सी. भाग २ व जून २००६ पासून बी. एस्सी. भाग ३ हे अभ्यासक्रम सुरु झालेले आहेत.

सदरच्या महाविद्यालयाने विहित वेळेत प्रस्ताव सादर न केल्याने व्यवस्थापन परिषदेने त्यांना रु.५०००/- इतका दंड आकारुन प्रस्ताव स्विकारण्यास मान्यता दिलेली होती.

सदरच्या महाविद्यालयाच्या प्रस्तावामध्ये बी. एस्सी. भाग २ करीता भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, सुक्ष्मजीवशास्त्र, विजाणूशास्त्र, संगणकशास्त्र, गणित, जैविकतंत्रज्ञान इ. विषयाची मागणी केलेली आहे.

जैविकतंत्रज्ञान हा स्वतंत्र अभ्यासक्रम असल्यामुळे त्यास एक विषय म्हणून मान्यता देता येत नाही.

मा.कुलगुरुंनी महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समितीच्या वतीने फक्त तीन भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व सुक्ष्मजीवशास्त्र या विषयांना व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ शिफारस केलेली आहे.

सदरचा प्रस्ताव शासनास शिफारस करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र. ७: के. एन. भिसे आर्टस् ॲन्ड कॉमर्स महाविद्यालय, कुर्डूवाडी या महाविद्यालयाचे नैसर्गिक वाढीचे प्रस्ताव शासनास शिफारस करण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय:-**

**विषय क्र. ८(१) सोलापूर विद्यापीठातील संकुल प्रणालीच्या विविध अभ्यासक्रमांच्या सुधारित शुल्काचा Ordinance तयार करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी.**

टिपणी: जून २००८ पासून सोलापूर विद्यापीठाकडील अधिविभागांना संकुल प्रणालीत समाविष्ट करण्यात आलेले आहे. सोलापूर विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमाचे शुल्क निर्धारण करण्यासाठी विद्यापरिषद व व्यवस्थापन परिषदेची खालील समिती गठीत करण्यात आलेली होती.

१. प्राचार्य जे. के. बिले
२. प्रा. डॉ. पी. जी. मोरे
३. प्राचार्य के. एम. जमादार
४. डॉ. डी. डी. रणनवरे
५. प्र. संचालक म. व वि. वि. मं. - सचिव

सदरच्या समितीने सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे विविध अभ्यासक्रमांच्या शुल्काची शिफारस केलेली होती. सदरच्या शिफारशीस महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ३० (q) नुसार विद्यापरिषदेने दि.१९/०६/२००८ रोजीच्या बैठकीत व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

सबब सदरच्या शुल्क महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (व्ही) अन्वये व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिल्यानंतर सदरचा शुल्काचा Ordinance तयार करुन मा. कुलपतींच्या मान्यतेसाठी पाठविला जाणार आहे.

सबब उपरोक्त प्रमाणे सुधारित शुल्काची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी.

**ठराव क्र. ८(१): सोलापूर विद्यापीठातील संकुल प्रणालीच्या विविध अभ्यासक्रमांच्या सुधारित शुल्काचा Ordinance तयार करण्यास व्यवस्थापन परिषदेने खालील दुरुस्तीसह मान्यता दिली.**

**१) सोलापूर विद्यापीठातील संकुल प्रणालीच्या विविध अभ्यासक्रमांच्या सुधारीत शुल्कास दुरुस्तीसह मान्यता देण्यात आली आणि व्यवस्थापन परिषदेने मान्य केलेल्या शुल्काचा Ordinance मा.कुलपतींच्या मान्यतेस्तव पाठवावा असे ठरले.**

**विषय क्र. ८(२): व्यवस्थापन परिषद निांक २८/३/२००८ मधील ठराव क्र. १३ अनुसार डॉ. सुभाष कदम यांच्या चौकशी समितीच्या संदर्भात त्यांच्या मागणीनुसार परत एकदा त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी त्यांना दि.९/७/२००८ रोजी व्यवस्थापन परिषदेसमोर आपले म्हणणे मांडण्यास हजर राहण्यास कळविलेले आहे. तरी डॉ. सुभाष कदम यांचे म्हणणे नैसर्गिक न्यायानुसार व्यवस्थापन परिषदेसमोर ते मांडतील याबाबत सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

**ठराव क्र. ८(२): सदरचा विषय त्यांचे लेखी म्हणण्यासह व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीमध्ये ठेवण्याचे ठरले.**

**विषय क्र. ८(३): भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालय, केगांव या महाविद्यालयाचा जून २००८ पासूनच्या एम.सी.ए. भाग २ या अभ्यासक्रमाचा नैसर्गिक वाढीचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी: व्यवस्थापन परिषदेच्या दि.२८/३/२००८ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. २२ अन्वये भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयास एम.सी.ए. भाग १ करीता शासनाकडून मान्यता प्राप्त झालेली नाही. त्यामुळे सदरच्या महाविद्यालयाचा एम.सी.ए. भाग २ या अभ्यासक्रमाचा नैसर्गिक वाढीचा प्रस्ताव शासनास शिफारस न करण्याचा निर्णय व्यवस्थापन परिषदेने घेतलेला होता.

तथापि तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/नियतठेव/२००८/५८४ दि.२४ जून २००८ अन्वये सदर अभ्यासक्रमाचे

प्रवेश शैक्षणिक वर्ष २००७-०८ मध्ये झालेले असल्यामुळे शासनाने संदर्भाधिन शासन शुध्दीपत्रक दि.१५/६/२००८ अन्वये आपणांस शैक्षणिक वर्षे २००७-०८ पासून अभियांत्रिकी महाविद्यालयात एम.सी.ए. हा पदव्युत्तर अभ्यासक्रम ६० विद्यार्थी संख्येच्या प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास परवानगी दिलेली असल्याचे कळविलेले आहे.

या महाविद्यालयाने एम.सी.ए. भाग २ या अभ्यासक्रमाच्या नैसर्गिक वाढीचा प्रस्ताव विद्यापीठाकडे दि.२/२/२००८ रोजी सादर केलेला आहे. सदरचा प्रस्ताव विद्यापीठ नियमानुसार ३१ ऑगस्ट २००७ पूर्वी सादर करणे गरजेचे होते. सदरचा प्रस्ताव त्यानुसार विद्यापीठास प्राप्त नाही. सदरच्या प्रस्तावाचे शुल्क व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेनंतर भरुन घेणेत येईल.

नैसर्गिक वाढीच्या प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे शिफारस करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. ८(३): भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालय, केगांव या महाविद्यालयाचा जून २००८ पासूनच्या एम.सी.ए. भाग २ या अभ्यासक्रमाचा नैसर्गिक वाढीच्या प्रस्तावास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. ८(४): तक्रार निवारण समितीने केलेल्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी.**

टिपणी: तक्रार निवारण समितीकडे आलेल्या अर्जाची छाननी करुन सदरचे अर्ज तक्रार निवारण समितीपुढे सुनावणीसाठी ठेवण्यात आलेले होते. सदरच्या अर्जावर निर्णय झालेल्या शिफारशी सोबत जोडलेल्या आहेत.

सदरच्या शिफारशींना Statutes ३३५ अन्वये व्यवस्थापन परिषदेची मान्यता आवश्यक आहे. याकरिता तक्रार निवारण समितीच्या शिफारशी मा.व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र. ८(४): तक्रार निवारण समितीने व्यवस्थापन परिषदेस सादर केलेल्या अनुक्रमे श्री. एन. डी. नवगिरे, प्रा. एस. एम. घत्तरगी, एस. सी. हेगडे, डॉ. बी. आर. पिरगोंडे यांच्या तक्रारीबाबत केलेल्या शिफारशी आहे तशा मान्य करण्यात आल्या तसेच श्री. एन. एन. जाधव यांच्या तक्रारीबाबत तक्रार निवारण समितीने केलेल्या शिफारशीमध्ये खालील दुरुस्तीसह मान्य करण्यात आली.**

**सदर महाविद्यालयात संबंधित विषयाचा शिल्लक कार्यभार सध्या श्री. ए. एन. जाधव यांना देण्यात यावा व भविष्यात निर्माण होणाऱ्या पूर्णवेळ खुल्या पदावर श्री. जाधव यांना सामावून घेण्यात यावे.**

**विषय क्र. ८(५): बी. एड. या अभ्यासक्रमाच्या सत्र प्रारंभ व सत्र समाप्तीच्या तारखामध्ये बदल करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी: सोबत मा.प्राचार्य दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर या महाविद्यालयाकडून दि.३/६/२००८ रोजी बी. एड. या महाविद्यालयांच्या सत्रारंभ व समाप्तीच्या तारखामध्ये बदल करण्याबाबतचे विनंती पत्र सोबत जोडले आहे.

यापूर्वी विद्यापीठाने बी.एड. / एम. एड. / एम. पी. एड. / बी. पी. एड. या महाविद्यालयांचे सत्रारंभ तारीख खालीलप्रमाणे होत्या.

| सत्र | विद्यापीठाने यापूर्वी ठरविलेल्या तारखा | नवीन तारखा |
|---|---|---|
| प्रथम सत्र प्रारंभ व समाप्ती | १ जुलै २००८ ते २९ नोव्हेंबर २००८ | १ जुलै २००८ ते १५ ऑक्टोबर २००८ |
| द्वितीय सत्र प्रारंभ व समाप्ती | २९ डिसेंबर २००८ ते २० मे २००८ | ८ नोव्हेंबर २००८ ते ३० एप्रिल २००८ |

उपरोक्त प्रमाणे सदरच्या बी. एड. (शिक्षणशास्त्र विद्याशाखा) या महाविद्यालयांच्या सत्र प्रारंभ व समाप्तीच्या तारखामध्ये बदल करावा किंवा नाही याबाबत निर्णय घेण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र. ८(५):** **बी. एड. या अभ्यासक्रमाच्या सत्र प्रारंभ व सत्र समाप्तीच्या तारखामध्ये बदल करण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. ८(६):** **दि.०५/०७/२००८ रोजी आयोजित करण्यात आलेल्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीच्या शिफारशी मान्यतेसाठी सादर.**

टिपणी: दि.०५/०७/२००८ रोजी आयोजित केलेल्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीच्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र. ८(६):** **दि.०५/०७/२००८ रोजी आयोजित करण्यात आलेल्या वित्त व लेखा समितीच्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेने मान्य केल्या.**

**विषय क्र. ८(७):** **बांधकाम समितीच्या दि.०८ जुलै २००८ रोजी झालेल्या सभेतील बांधकाम समितीने केलेल्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी.**

टिपणी: बांधकाम समितीची दि.०८ जुलै २००८ रोजी सभा झाली. या सभेत बांधकाम समितीने केलेल्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र. ८(७):** **बांधकाम समितीच्या दि.०८ जुलै २००८ रोजी झालेल्या सभेतील बांधकाम समितीने केलेल्या शिफारशी खालील दुरुस्त्यांसह व्यवस्थापन परिषदेने मान्य केल्या.**

**१) ठराव क्र. ४ मध्ये, "सदर कामाचा तपशील खालीलप्रमाणे ४(i), ४(ii), ४(iii), ४(iv) याप्रमाणे उर्वरीत बांधकामाच्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात आली" अशी दुरुस्ती करावी.**

**४(i) - सदरचे काम श्री. विशाल व्ही. जोग सोलापूर यांना अंदाजपत्रकापेक्षा २.८०% कमी दराने देण्याचे मान्य करण्यात आले.**

**४(ii) - सदरचे काम श्री. विशाल आर. भट्टड सोलापूर यांच्याशी मा. कुलगुरुंनी चर्चेसाठी बोलावून घेऊन व वाटाघाटी करुन वर्क ऑर्डर देण्याचे ठरले.**

**४(iii) - सदरचे काम श्री. विशाल व्ही. जोग, सोलापूर यांना अंदाजपत्रकापेक्षा ३.५०% कमी दराने देण्याचे मान्य करण्यात आले.**

**४(iv) - सदरचे काम मे. योगेश्वरी इलेक्ट्रिकल्स, सोलापूर यांच्याशी मा.कुलगुरुंनी चर्चेसाठी बोलावून घेऊन व वाटाघाटी करुन वर्क ऑर्डर देण्याचे ठरले.**

**२) ठराव क्र. ५ मध्ये, "सदर कामाचा तपशील खालीलप्रमाणे ५(i), ५(ii), ५(iii), ५(iv), ५(v) याप्रमाणे उर्वरीत बांधकामाच्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात आली" अशी दुरुस्ती करावी.**

**५(i) - सदरच्या कामासाठी पुन्हा निविदा मागवाव्यात आणि मा.कुलगुरुंनी निर्णय घ्यावा असे ठरले.**

**५(ii) - सदरच्या कामासाठी मे. बालमुकुंद आर. राठी यांना मा.कुलगुरुंनी चर्चेसाठी बोलावून घेऊन व वाटाघाटी करुन निर्णय घ्यावा असे ठरले.**

**५(iii) - सदरच्या कामासाठी श्री. सुहास एस. हलकुडे सोलापूर यांना चर्चेसाठी बोलावून मा.कुलगुरुंनी वाटाघाटी करुन निर्णय घ्यावा असे ठरले.**

**५(iv) - सदरचे काम श्री. सुहास एस. हलकुडे, सोलापूर यांना अंदाजपत्रकापेक्षा १% कमी दराने मान्य करण्यात आले.**

**५(v) - सदरचे काम श्री. बालमुकुंद आर. राठी, सोलापूर यांना अंदाजपत्रकापेक्षा २% जादा दराने देण्याचे मान्य करण्यात आले.**

**५(vi) - सदरचे काम मे. योगेश्वरी इलेक्ट्रिकल्स, सोलापूर यांच्याशी मा.कुलगुरुंनी चर्चेसाठी बोलावून व वाटाघाटी करुन वर्क ऑर्डर देण्याचे ठरले.**

**विषय क्र. ८(८):** **उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सोलापूर विद्यापीठासाठी मंजूर केलेल्या १५० शिक्षकेतर पदांपैकी ३० पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबत सांगितले त्यानुसार मा.कुलगुरु यांनी केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर.**

टिपणी: उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दि. ११ मे २००७ रोजीच्या शासन निर्णयानुसार सोलापूर विद्यापीठास एकूण १५० शिक्षकेतर पदे (सध्याच्या ४१ पदांसह) म्हणजे नव्याने १०९ शिक्षकेतर पदे भरण्यास मान्यता दिलेली आहे. परंतु सदर नव्याने १०९ शिक्षकेतर पदांना मान्यता देताना शासनाने ३० शिक्षकेतर पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबत सांगितले आहे. कंत्राटी पध्दतीने भरावयाची ३० शिक्षकेतर पदे कोणत्या प्रकारची म्हणजे कोणती ३० शिक्षकेतर पदे कंत्राटी पध्दतीने घ्यावयाची याबाबत मा.कुलगुरु यांनी केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर.

**ठराव क्र. ८(८):** **उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सोलापूर विद्यापीठासाठी मंजूर केलेल्या १५० शिक्षकेतर पदांपैकी (सध्याच्या ४१ शिक्षकेतर पदांसह) कंत्राटी पध्दतीने ३० शिक्षकेतर पदांबाबत मा.कुलगुरु यांनी केलेल्या कार्यवाहीची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली.**

मा. अध्यक्षांच्या परवानगीने मा.सचिव यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
एम. एस. शेजूळ
सदस्य सचिव, व्यवस्थापन परिषद

सही/-
बी. पी. बंडगर
अध्यक्ष, व्यवस्थापन परिषद